सुधारित परिपत्रक

# मुंबई विद्यापीठ

क्र. ध. म./ ३१ /२०१३–२०१४

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांचे व विद्यापीठातील अध्यापकांची सेवानिवृत्ती वयोमर्यादा ६० वरुन ६२ करणेबाबतचे ८ निकष शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. तथापि शासन निर्णय दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ मध्ये शासन शुध्दीपत्रकामध्ये परिच्छेद ५ मधील (६) मध्ये संबंधित अध्यापकाने विभागीय/राज्य/राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमामध्ये किती पारितोषिके/पुरस्कार/प्रशस्तीपत्रक प्राप्त केलेली आहेत असा एकच मुद्दा नमूद केलेला आहे. तद्अनुषंगाने शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१, यांचे पत्र क्रमांक युएनआय/(३६०/१३)/२०१३/नावि/विशि–१ /२६८, दिनांक १८ जानेवारी, २०१४ अन्वये आदेशित केलेले आहे. त्यानुसार यापुढे सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठाला सादर करण्याकरिता अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांचे एकूण निकष हे ८ ऐवजी ७ राहतील. तसेच, पारितोषिके/पुरस्कार/प्रशस्तीपत्रक शासनाने किंवा शासन यंत्रणेकडून देण्यात आलेले असल्यास त्यांचाच निकषामध्ये समावेश करण्यात येईल. (प्रत संलग्न)

तरी, याप्रकरणाची संचालनालयाने निर्देशित केल्याप्रमाणे बदल करुन त्याप्रमाणे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करण्याची संबंधित प्राचार्यांनी दक्षता घ्यावी.

(सही) 18/3/14

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १८/०३/२०१४

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१०. मा. श्री विकास तु. कदम, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
११. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
१२. मा. सह–संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
१३. मा. सह–संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा – रायगड – ४१० २०६.
१४. सह–संचालक, टेक्नीकल एज्युकेशन डिपार्टमेंट, खेरवाडी, बांद्रा(पु),मुंबई–४०००५१.
१५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१६. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१८. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१०. समन्वयक,विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.),विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ,मुंबई–९८.
११. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(सही) 18/3/14.

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांना शैक्षणिक कामकाजाचा आढावा

सेवानिवृत्ती वय ६० वरुन ६२ करण्याबाबत

महाविद्यालयाचे नाव

अध्यापकाचे नाव

विषय

| अ.क्र. | पी.एच.डी. प्राप्तीचा दिनांक | वैद्यकीय प्रमाणपत्र असल्यास त्याचा तपशील | गोपनीय अहवालातील प्रतवारी वर्षनिहाय (मागील पाच वर्षांच्या गोपनीय अहवाल शेरा व प्रतवारी नोंदवावी) | वैद्यकीय प्रमाणपत्र | संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरूपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत? | किती संशोधन लेख (Research Article) प्रकाशित केले आहेत? | राज्य / राष्ट्रीय / आंतर राष्ट्रीय स्तरावरील किती कार्यशाळा चर्चासत्रात उपस्थित राहिले? | अध्यापन करीत असलेल्या विषयातील एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत? त्यापैकी किती संदर्भग्रंथाचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे? | अध्यापन करीत असलेल्या विषयाव्यतिरिक्त एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत? त्यापैकी किती संदर्भग्रंथाचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे? | अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण / मंडळ / संस्था यावर सदस्य आहेत? | अध्यापन करीत असलेल्या विषय व इतर उपक्रमामध्ये किती पारितोषिके मिळाली आहेत? / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील किती पुरस्कार प्राप्त झाले? | समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |

| अध्यक्ष | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य सचिव |
|---|---|---|---|---|---|
| प्र-कुलगुरु | विभागीय सहसंचालक | विभाग प्रमुख | महाविद्यालयाचे प्राचार्य | कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले विषय तज्ञ | परिक्षा नियंत्रक |